**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** दिग्रस
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0084 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/02/2026 23:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 03/02/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/02/2026
**Time From (वेळेपासून):** 15:22 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:44 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/02/2026 **Time (वेळ):** 22:37 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 044
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/02/2026 22:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उपअधीक्षक भूमी अभिलेख्र कार्यालय, दिग्रस येथील नगर भुमापन कक्ष,दिग्रस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मनोज गजानन ओरके

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अँन्टी करप्पन ब्युरो,यवतमाळ,दिग्रस,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अँन्टी करप्पन ब्युरो,यवतमाळ,दिग्रस,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8855080007

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सखाराम नरसिंग पवार | | | 1. उप अधीक्षक, भूमी अभिलेख , कार्यालय दिग्रस,दिग्रस, यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | आशिष काशिनाथ शेलोकार | | | 1. उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय,दिग्रस,दिग्रस, यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

पोलीस स्टेशनला येताच

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपये दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी मनोज ओरके, वय 39 वर्ष, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्षन ब्युरो, यवतमाळ फिर्याद देतो की, मी पोलीस निरीक्षक म्हणून दिनांक 07/03/2025 पासून अँन्टी करप्षन ब्युरो, कार्यालय यवतमाळ येथे नेमणुकीस आहे. दिनांक 22/01/2026 रोजी अँन्टी करप्षन ब्युरो, कार्यालय यवतमाळ येथे हजर असतांना तक्रारदार मारीया सलमान खान, वय 34 वर्ष, धंदा- गृहीणी, ह.मु. भारत नगर, दिग्रस, जि. यवतमाळ येथे श्री रघुनाथ भगत यांचे घरी किरायाने. मुळ पत्ता बाराभाई मोहल्ला, एम.एस बिछायत केन्द्र जवळ, दिग्रस ता.दिग्रस,जि. यवतमाळ या लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय,यवतमाळ येथे आल्या व त्यांनी त्यांची तोंडी तक्रार सांगितली. तक्रारदार यांनी सांगितलेल्या तक्रारीवरुन पुढील कार्यवाही करिता जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ येथुन शासकीय पंच बोलावुन तक्रारदार व पंचांची ओळख करुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी पंचासमक्ष सांगितले की, तक्रारदार यांचे सासरे यांनी त्यांचे मालकीची मालमत्ता तक्रारदार व त्यांचे पती यांना मुस्लीम पर्सनल लॉ नुसार हिंबा (ओरल गिफ्ट) करुन दिली होती. सदर मालमत्ता हिबानुसार फेरफार करून मिळण्याकरिता भुमीअभिलेख कार्यालय, दिग्रस येथील श्री आशिष शेलोकार यांना भेटुन विचारणा केली असता त्यांनी श्री एस.एन. पवार, उप अधिक्षक, भुमीअभिलेख दिग्रस यांना भेटण्यास सांगीतले. त्यावरून श्री एस.एन. पवार यांना दिनांक 19/01/2026 रोजी भेटले असता ते फेरफार करण्याकरिता 5000/- रुपये लाच मागणी करित आहेत अशी आमच्या व पंचांच्या समक्ष तोंडी हकीकत सांगितली. त्यानंतर आम्ही त्यांना त्यांची लेखी तक्रार लिहुन देण्यास सांगितली. त्यांनी लिहुन दिलेली लेखी तक्रार पुढील प्रमाणे आहे." मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय यवतमाळ येथे येवुन समक्ष माझी लेखी तक्रार देते की, मी वरील ठिकाणी माझे पतीसह राहत असुन माझे शिक्षण बारावी पर्यंत झाले असुन मला मराठी लिहता व वाचता येते.माझे सन 2013 साली सलमान खॉ वल्द शब्बीर खॉ यांचे सोबत लग्न झाले आहे. माझे सासरे शब्वीर मेहवुव खॉ यांचे वय 82 वर्ष आहे. त्यांचे नावे मौजा दिग्रस, तालुका -दिग्रस, जिल्हा- यवतमाळ येथे असलेल्या नगर भुमापन नंबर 150, शीट न. 5 डी, प्लाट नं. 150 मधील 35.68 चौ मी. ही मालमत्ता आहे. त्या मालमत्तेमधुन 25.28 चै. मी. मालमत्ता त्यांनी माझे पती सलमान खॉ व मला दि. 27/11/2025 रोजी 100 रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर मुस्लीम पर्सनल लॉ नुसार हिबा/ ओरल गिफ्ट ( बक्षीस पत्र ) करून दिली आहे.त्यावरुन मी सदर मालमत्तेमध्ये ~~माझे व माझे पतीचे नाव समाविष्ट करण्याकरिता दि. 11/12/2025 रोजी अर्ज, 100 रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर~~ मुस्लीम पर्सनल लॉ नुसार केलेले हिबा/ ओरल गिफ्ट ( बक्षीस पत्र ), मालमत्ता पत्रक हि कागदपत्रे घेवुन भुमीअभिलेख कार्यालय, दिग्रस येथे गेले होते. तेथे काम करणारे श्री आशिष शेलोकार यांचेकडे कागदपत्रे दिली. त्यांनी त्यावर 11/12/2025 अशा तारिख टाकुन पोच दिली, परंतु त्यावर सही केली नाही. त्यानंतर मी सोमवार दि. 19/01/2026 रोजी भुमी अभिलेख कार्यालय दिग्रस येथे जावुन तेथे काम करणारे श्री आशिष शेलोकार यांची भेट घेतली. त्यांनी तुमचे काम झालेले नाही, तुम्ही पवार साहेबांना भेटुन घ्या असे सांगीतले त्यावरून मी श्री एस. एन. पवार, उप अधिक्षक, भुमीअभिलेख दिग्रस यांची त्यांचे कार्यालयात भेट घेतली व त्यांना मी दिलेल्या अर्जा संबधाने काय कार्यवाही केली आहे याबाबत विचारले असता, त्यांनी सांगीतले की, "तुम्हाला काम करून घेण्यासाठी मला 5000/- रू दयावे लागतील, पैसे दिले नाही तर तुमचे काम होणार नाही" असे त्यांनी मला सांगितले. त्यावर मी नाईलाजास्तव त्यांना हो म्हणुन तेथुन निघुन आले.मला श्री एस.एन. पवार, उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय दिग्रस यांना लाच रक्कम द्यावयाची नसल्याने मी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार देण्याकरीता आज रोजी समक्ष लाचलचुपत प्रतिबंधक विभाग कार्यालय यवतमाळ येथे समक्ष हजर राहुन माझी लेखी तक्रार देत आहे. माझी

श्री एस.एन. पवार, उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय दिग्रस यांचेषी कोणत्याही प्रकारची दुष्मनी नसुन त्यांचेसोबत कोणत्याही प्रकारचा पैशाचा उधार उसणवारीचा व्यवहार आमचेत नाही. मी माझे तक्रारीसोबत पुढील कार्यवाही करण्याकरीता भुमी अभिलेख कार्यालय येथे सादर केलेल्या वर नमुद कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करीत आहे." उपरोक्तपणे लेखी तक्रार व त्यात नमुद कागदपत्रे तक्रारदार मारीया सलमान खान यांनी आम्हाला दिली व दिनांक 23/01/2026 रोजी तक्रारदार यांचे विनंतीवरुन पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर आम्ही दिग्रस येथे दिनांक 23/01/2026 रोजी तक्रारदार मारीया खान यांची भेट घेतली असता त्यांनी सांगितले की,श्री.पवार, उपअधीक्षक हे भूमी अभिलेख कार्यालय,दिग्रस येथे असुन त्यांची भेट घेण्याकरिता मला पंचासह लाच मागणीची पडताळणी करण्याकरिता भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस येथे पाठवावे अषी विनंती केली होती. त्यावरुन आम्ही तक्रारदार यांना पंचासह श्री. पवार, उपअधीक्षक यांची भेट घेण्याकरिता तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डरसह रवाना केले होते. तक्रारदार यांनी शासकीय पंच क्र.01 यांचेसह लोकसेवक श्री.पवार, उपअधीक्षक यांची भेट घेतली व त्यांचे सोबत प्रलंबित फेरफारच्या अनुषंगाने चर्चा केली. चर्चेदरम्यान श्री.पवार, उपअधीक्षक यांनी तक्रारदार यांचे षेलोकार यांचे सोबत फोनवर बोलने करून दिले असता श्री.षेलोकार यांनी तक्रारदार यांना त्यांचे कामाकरीता दोन दिवसांनी येवुन भेटा असे फोनवर म्हटल्याने तक्रारदार व लोकसेवक श्री. पवार,उपअधीक्षक यांच्यात झालेले संभाषणाबाबत सविस्तर पंचनामा तक्रारदार व पंचांच्या मदतीने दिनांक 23/01/2026 रोजी करण्यात आलेला आहे.

दिनांक 02/02/2026 रोजी तक्रारदार मारीया खान यांनी आम्हास फोनव्दारे सांगितले की, दिनांक 03/02/2026 रोजी श्री.शेलोकार हे मला भेटणार आहे त्यामुळे दिनांक 03/02/2026 रोजी दिग्रस येथे येवुन त्यांनी दिलेल्या तक्रारीची पुन्हा पडताळणी करण्यावावत विनंती केल्याने दिनांक 03/02/2026 रोजी पंच व पथकासह चिरकुटा धरण येथे जावुन तक्रारदार यांची भेट घेतली असता त्यांनी सांगितले की, लोकसेवक श्री.पवार, उपअधीक्षक व श्री.शेलोकार हे भुमी अभिलेख कार्यालय, दिग्रस येथे हजर असुन मला त्यांची भेट घेण्याकरिता भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस येथे पाठविण्याबावत विनंती केली. त्यावरुन आम्ही तक्रारदार यांना पंचासह श्री.पवार, उपअधीक्षक व षेलोकार यांची भेट घेण्याकरिता तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डरसह रवाना केले होते. तक्रारदार यांनी शासकीय पंच क्र.01 यांचेसह लोकसेवक श्री. पवार, उपअधीक्षक व आशिष शेलोकार, नझुल परिरक्षण भूमापक यांची भेट घेतली व त्यांचे सोबत प्रलंवित फेरफारच्या अनुषंगाने चर्चा केली चर्चेदरम्यान आशिष शेलोकार, नझुल परिरक्षण भूमापक यांनी तक्रारदार यांचे अर्जावरुन फेरफार करण्यासाठी स्वतःकरिता व श्री.सखाराम पवार, उपअधीक्षक यांचेकरिता 5000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

यानंतर दिनांक 03/02/2026 रोजी सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार श्रीमती मारीया खान यांनी 500/- रुपये दराच्या 10 नोटा असे एकुण 5,000/-रु. जमवुन आमचेकडे सापळा कार्यवाही करीता हजर केले असता नोटांच्या क्रमांकाचे टिपण तयार करून मपोका मुयरी कोल्हे यांनी सदर नोटांना तक्रारदार पंच व आमचे समक्ष अँन्थ्रासीन पावडर लावली व सापळा पुर्व पंचनाम्या प्रमाणे संपुर्ण कार्यवाही केली. तक्रारदार यांना पंचांसह सापळा आजमावण्याकरीता भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस येथे पाठविले व पथक हे देखील शासकीय वाहनाने तक्रारदार यांच्या पाठीमागे गेले. भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस येथे सापळा कार्यवाही आजमावली असता पंच क्रमांक 01 यांचे समक्ष श्री.शेलोकार यांनी उजव्या हातांनी 5,000/- रूपये लाच रक्कम स्विकारली. त्यानंतर तक्रारदार यांनी भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रसच्या बाहेर येवून सापळा लावलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना नियोजीत केलेला ईषारा केला असता ला प्र वि यवतमाळ चे अधिकारी व अमंलदार यांनी भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस येथे गेलो असता पंच पंच क्र 1 यांनी सांगितले की, श्री.शेलोकार हे लाच रक्कम स्विकारल्यानंतर उपअधीक्षक यांच्या कक्षात गेले आहेत. त्यानंतर आम्ही लगेच उपअधीक्षक यांच्या कक्षात पंचासह जावुन श्री.शेलोकार यांना पकडुन लाच रकमेसंबधाने विचारले असता त्यांनी सांगितले की, त्यांनी लाच रकमेमधील 2500/- रुपये स्वताजवळ ठेवले व उर्वरित लाच रक्कम 2500/- रुपये श्री.पवार, उपअधीक्षक यांना दिली असल्याबाबत सांगितल्याने लाच रक्कमेतील 2500/- रुपये श्री.षेलोकार यांचेकडुन व उर्वरित 2500/- रुपये लाच रक्कम श्री.पवार, उपअधीक्षक यांचेकडुन पंचासमक्ष हस्तगत करण्यात आली. यानंतर सखाराम नरसिंग पवार, उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस व आशिष काशिनाथ शेलोकार, नझुल परिरक्षण भूमापक यांना ताब्यात घेतले.एकंदरीत तक्रारदार मारीया सलमान खान, यांनी दिनांक 22/01/2026 रोजी दिलेल्या लेखी तक्रारीवरुन दिनांक 03/02/2026 रोजी पडताळणी केली असता पडताळणी कार्यवाही दरम्यान आशिष शेलोकार, नझुल परिरक्षण भूमापक यांनी तक्रारदार यांचे अर्जावरुन फेरफार करण्यासाठी स्वतःकरिता व श्री.सखाराम पवार, उपअधीक्षक याचेकरिता 5000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले त्यावरुन दिनांक 03/02/2026 रोजी चे 15/22 ते 15/44 वा.सापळा कार्यवाही दरम्यान आशिष शेलोकार, नझुल परिरक्षण भूमापक यांनी उपअधीक्षक

भूमी अभिलेख कार्यालय,दिग्रस येथील नगर भुमापन कक्षामध्ये तक्रारदार यांचेकडुन 5000/- रुपये लाच रक्कम स्विकारुन त्यामधील 2500/- स्वताकरिता स्विकारले व 2500/- रुपये लाच रक्कम श्री.पवार उपअधीक्षक भूमी अभिलेख यांना दिल्याचे निष्पन्न झाले आहे.आ.लो.से.क्र. 01) सखाराम नरसिंग पवार,वय - 49 वर्ष, पद - उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस जि.यवतमाळ यांचे कृत्य कलम 7,12 लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये तसेच आ.लो.से क्र.02) आशिष काशिनाथ शेलोकार वय 47 वर्ष, पद नझुल परिरक्षण भूमापक, भूमी अभिलेख कार्यालय,दिग्रस जि.यवतमाळ यांचे कृत्य कलम 7,7(A) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये अपराध होत असल्याने त्यांचे विरूध्द सदर कलमान्वये गुन्हा नोंद करण्याकरिता मी सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद देत आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
RAVINDRA DAMODAR JAGTAP
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): POBN76076
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** VAIJENATH KISHANR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN58150

ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन, दिग्रस

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)